
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




**Ajanta Prakashan**

Off. Principal
Late. N.P.W. College
L... ani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani
Ref No.
Dt.
Distt. Bhandara

# २६. बुद्धाचे तत्वज्ञान आणि मानवी जीवन

**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, स्व. निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा.

**प्रस्तावणा**

ऋग्वेदकालीन आर्य लोक निरनिराळया देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ करीत असत. यज्ञामध्ये निरनिराळया प्रकारची आहुती देत असत. सुरूवातीला यज्ञाचे स्वरूप अतिशय सोपे होते. सर्वसामान्य माणूस सुध्दा आपल्या घरी यज्ञ करू शकत होता. परंतू उत्तर वैदीक काळामध्ये ही परिस्थीती बदलली. यज्ञाला एखादया सणसभारंभाचे महत्व प्राप्त झाले. यज्ञामध्ये थोडीसी चुक होऊ नये. यज्ञ धर्मानुसार आणि रितीरिवाजानुसार व्हायला पाहिजे समजा यज्ञात चुक झाली तर पाप होते. अशी उत्तर वैदीक कालीन समाजाचा समज होता. यज्ञ हे ब्राम्हणाच्या हातानेच केल जात होते. यज्ञामध्ये क्वचित प्रसंगी पशुबळी आणि नरबळी दिल्याजात होती. तसेच यज्ञ करण्याचा मोबदला म्हणुन ब्राम्हणाला सुध्दा त्याच्या मताप्रमाणेच दक्षिणा दयावी लागत होती. श्रीमंत आणि सर्वसामान्याकडूनही ब्राम्हण दक्षिणा सारखी घेत असे आणि हा सर्व खर्च सर्व सामान्य जनतेला झेपण्यासारखा नव्हता परंतू यज्ञ केल्याशिवाय मोक्ष मिळत नाही. असा समज प्रचलित असल्यामुळे यज्ञ करणे आवश्यक होते. परंतू यज्ञातला जटील स्वरूप प्राप्त झाल्यामुळे सर्वसामान्य जनता हा खर्च भागवू शकत नव्हते. त्यामुळे यज्ञ पध्दती सामान्य जनतेला करता येईल अशा प्रकारचा धर्म असावा आणि त्या धर्माचे तत्वज्ञान सुध्दा न्याय प्रकारचे असावे. असे सर्वसामान्य जनतेला वाटू लागले आणि त्यातूनच साधासोपा व सर्वसामान्यांना समजेल अशा बौध्द धर्माचा उदय झाला.

**बौध्द धर्माची तत्त्वे (बुध्दाची शिकवण)**

1) **चार आर्य सत्य :–** शास्वत सत्याची जगाला ओळख करून देण्यासाठी गौतम बुध्दानी ज्या चार तत्त्वांचा अवलंब केला. त्यालाच बौध्द धर्माची चार आर्यसत्य म्हणतात. ती खालीलप्रमाणे

a) जिवन हे दुःखमय आहे.

b) दुःखाचे मुळ कारण तृष्णा होय. (इच्छा) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही गोष्टीबद्दल वाटणारी आशा, आसनशक्ती म्हणजे तृष्णा होय.

c) इच्छेचा त्याग केल्याशिवाय दुःखमुक्त होता येणार नाही.

d) इच्छेचा त्याग करण्यासाठी अष्टांग मार्गाचा अवलंब करावा.

**2) अष्टांग आर्य मार्ग :–** इच्छेचा त्याग करण्यासाठी गौतम बुध्दाने अष्टांग मार्गाचा अवलंब करण्यास सांगितला ते अष्टांग मार्ग खालीलप्रमाणे

a) सम्यक दृष्टी :– चांगल्या मार्गावर गाढ श्रध्दा ठेवावी.

b) सम्यक विचार :– नेहमी चांगले विचार करावे आणि प्रत्यक्ष त्याचे आचरण करावे.

c) सम्यक भाषण :– सत्य बोलावे, कमी बोलावे, मृदू बोलावे आणि वाईट बोलून दुसऱ्याची मन दुःखवू नये.

d) सम्यक कृती :– दानधर्म कराव आणि प्राणी मात्रावर दया करावी.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No. ११८
Dt.
Scanned with CamScanner

म्यक उपजिवीका :– चांगल्या मार्गानी मिळवलेल्या संपत्तीवर उपजिवीका किंवा उदरनिर्वाह करावा.

म्यक प्रयत्न :– विवेक सदाचार आणि नितीचा मार्ग अवलंबावा तरोच चांगल्या मार्गानी प्रयत्न करावे.

म्यक संकल्प :– इच्छेचा त्याग करून कर्मापासून मुक्ती मिळवावी.

म्यक समाधी :– चित्त एकाग्र करावे.

रील अष्टांग मार्गाचा योय रितीने पालन केल्यास कोणत्याही व्यक्तीला मोक्ष मिळू शकतो.

**ा महत्त्व (भर)**

गौतम बुध्दानी आपल्या धर्मामध्ये अहिंसेला महत्त्व दिले असले तरी ते जैन धर्माइतके आचरण्यास ह्ते. दया, करूणा आणि प्रेम हेच बुध्दाला अपेक्षित होते. पंरतू त्यांनी माणसाहराला बंदी दिली नाही.

**च्या अस्तित्वाविषयी मोन**

मनुष्याचे जीवनात तसेच सृष्टीवर ईश्वराचे स्थान काय असावे हयाविषयी बुध्दाने आपले मत केले नाही.

***ा आणि सदाचाराला महत्त्व***

*ौतम बुध्दानी आपल्या धर्मामध्ये सदगुण आणि सदाचाराला विषेश महत्त्व दिले आहे.*

रकारचा भेदभाव न करता सर्वांना आपल्या धर्मामध्ये समान संधी दिली म्हणजेच आपल्या धर्मामध्ये सर्वांना प्रवेश

बौध्द धर्मातील प्रमुख तत्त्वे समजली जातात.

प्राण्यांना ठार न मारने. (अहिंसा)

खोटे बोलू नये. (सत्य)

चोरी करू नये.

मादक पदार्थाचे सेवन करू नये.

रकी स्त्री पवित्र मानावी. (व्यभिचार करू नये)

**नामुळे झालेले परिणाम**

तातील सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकिय जीवनावर बौध्द धर्माचा बराच परिणाम घडून आला, त्याचा आढावा घेता येईल.

**सोपा आणि लोकप्रिय धर्म :** गुंतागुंतीच्या वैदिक धर्माऐवजी एक साधा सोपा सर्वांना समजेल असा धर्म, गौतम ाला दिला हा भारताचा फारच मोठा लाभ समजायला पाहिजे. सोपी भाषा, सोपा सदाचार इत्यादींमुळे हा धर्म शय लवकर लोकप्रिय झाला.

**उच्च नैतिक शिकवण :** गौतम बुध्दाने आपल्या अनुयायांकरिता एक उच्च आदर्श आणि व्यावहारिक नितियुक्त चत करून दिले. बुध्दाच्या या शिकवणुकीमुळे समाजातील चारित्र्यसंवर्धनाला मोठ्या प्रमाणात मदत झाली. ध्दा बौध्द धर्माचा उदय होण्यापूर्वी उच्च नीतीतत्वांचा पुरस्कार केलेला होता. परंतू बौध्द काळात जितक्या मोठ्या त्र्य संवर्धन घडून आले तसे उपनिषद काळात घडून आलेले आढळून येत नाही. भारतातील समाजजीवनाला ी शिकवणूक अत्यंत उपकारक ठरली.



Off. Principal
Late. N.P.W. College
Late N. P. W. College, Lakhani
Ref No.
Dt.
Scanned with CamScanner

**3) हिंदू धर्मावरील परिणाम :** उत्तर काळात हिंदू धर्मावरसुध्दा बौध्द तत्वज्ञान आणि विचार यांचा सखोल ठसा उमटला असे म्हणावे लागते. बौध्द धर्माने जरी हिंदू धर्माचे उच्चाटन केले नाही तरी त्याचा सखोल परिणाम हिंदू धर्मावर झालेला आपल्याला दिसून येतो. अहिंसा हया तत्वाचा म्हणूनच नंतरच्या काळात हिंदू धर्मात अंतर्भाव करण्यात आला. हिंदू धर्माला बौध्द धर्माने बऱ्याच प्रमाणात मानवी स्वरूप आणून दिले.

**4) मठ पध्दती :** आपले संघटन करून ठिकठिकाणी मठ स्थापन करून धर्माचा प्रसार करता येतो, ही गोष्ट बौध्द धर्माने भारताला प्रथमतःच दाखवून दिली. बौध्द धर्माचा उदय होण्यापूर्वी दाट वनात जाऊन लोक ईश्वरभक्ति करीत असत. परंतु आता समान विचारांचे लोक एकत्रित येऊन त्यांनी सांघिक जीवन घालवावे, मठातील शिस्त काटेकोरपणाने पाठावी आणि ईश्वरचिंतन करीत असतांना आपल्या धर्माचा प्रसारसुध्दा करावा हि नवीनच कल्पना बौध्द धर्माने भारतात दिली.

**5) मूर्तीपूजा :** आर्य धर्मामध्ये मूर्तिपूजेला विशेष स्थान नव्हते. वैदिक धर्मात यज्ञसंस्थेला जास्त महत्व देण्यात आलेले होते परंतू बौध्द धर्मातील महायान पंथामुळे हिंदू धर्मात सुध्दा पूर्तीपूजेला जास्त प्राधान्य मिळू लागले.

**6) बोलभाषांचा विकास आणि विस्तार :** सर्व सामान्य लोकांकरिता बौध्द धर्माचा उदय झाल्यामुळे त्याचा प्रसारही लोकांच्या बोलभाषेतूनच करण्यात आला. त्यामुळे बोलीभाषांचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आला. प्राकृत भाषेत मोठ्या प्रमाणावर वाङ्‌मय निर्माण झाले. हा भारताचा मोठा लाभ समजला पाहिजे.

**7) स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकला यांचा विकास :** स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकला या क्षेत्रात बौध्द धर्माने तर क्रांतीच घडवून आणली. बौध्द धर्माचा उदय होण्यापूर्वी कला ही धर्माची वटीकच समजली जात असे त्यामुळे वैदिक काळात हया कलांचा विशेष विकास होऊ शकला नाही. बौध्द काळात मात्र हया सर्व कलांना मोठ्या प्रमाणामध्ये उत्तेजन मिळाले. बौध्द भिक्षुंनी स्तूप, विहार आणि मठ यांच्यात अप्रतिम कलाकृति निर्माण केल्या. चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला या क्षेत्रात बौध्द भिक्षुंनी मोठया प्रमाणात भर घातली ठिकठिकाणी स्तंभ उभारण्यात आले. पाषाणावर बौध्द चरित्र कोरून ठेवण्यात आले. बौध्द गुंफात अतिशय सुंदर शिल्प आजही सापडते. पुढे महायान पंथीयांनी बुध्दाची गणना देवतेमध्ये केल्यामुळे बुध्दाच्या मूर्ती जागोजागी तयार होऊ लागल्या. अजिंठा, एल्लोरा येथील शिल्प आणि मूर्ति आजही अप्रतिम समजल्या जातात.

**8) समतेची आणि सहनशीलतेची वागणूक :** बौध्द धर्माने जातीसंस्थेचा निषेध केला आणि समतेचा उद्घोष केला. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न मानता सर्वांनाच बौध्द धर्मात खुला प्रवेश होता. गौतम बुध्दाच्या या क्रांतीकारी शिकवणुकीमुळे जातिसंस्थेवर मोठा आघात घडून आला आणि समाजाची मोठ्या प्रमाणात प्रगती घडून आली. दुसऱ्या पंथातील अनुयायांचासुध्दा आपण आदर करावा ही शिकवण बौध्द धर्माने दिली. त्यामुळे समाजात सहनशीलता मोठ्या प्रमाणात वाढीला लागली.

**9) बौध्दिक स्वातंत्र्य :** वेदांचे प्रामाण्य, पुरोहित वर्गाचे वर्चस्व आणि यज्ञविधीतील गुंतागुंत यामुळे समाजात भौतिक स्वातंत्र्य शिल्लक राहिले नव्हते. गौतम बुध्दाने हया सर्वाविरूध्द बंड पुकारले. स्वतंत्र विचारांचा आणि बुध्दी स्वातंत्र्याचा त्याने जोरदार पुरस्कार केला. अंधश्रध्देपेक्षा त्याने डोळस विचारांवर जास्त भर दिला. यामुळेच बौध्द काळात नागार्जुन, असंग, वसुबंधू यासारखे थोर तत्वज्ञानी निर्माण होऊ शकले.

**10) भारतीय संस्कृतीचा प्रदेशातील प्रसार :** बौध्द धर्माचा प्रसार ज्या ज्या विदेशी प्रदेशात घडून आला त्या त्या ठिकाणी भारतीय संस्कृतीचासुध्दा विस्तार घडून आला असे आपल्याला दिसून येते. बौध्द धर्मामुळे भारताचा जगातील निरनिराळया देशांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित झाला. बौध्द धर्माचे प्रचारक ज्या ज्या ठिकाणी पोहचले त्या त्या ठिकाणी भारतीय संस्कृतीसुध्दा जाऊन पोहचली. हा भारताला झालेला मोठाच फायदा समजावा लागेल.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani, Dist. Bhandara
Ref No.-----
Dt.

Scanned with CamScanner

वैदिकधर्मातील यज्ञयागाला आणि ब्राम्हणांच्या वर्चस्वाला कंटाळलेले लोक बौध्द धर्माकडे आकृष्ट झाले. बौध्द धर्म हा वर आधारलेला असल्यामुळे सर्व सामान्य जनतेनी हया धर्माचा मोठया प्रमाणात स्विकार केला. दुःखाचे मुळ कारण काय गौतमानी शोधुन काढले आणि मानवाला दुःख मुक्त करण्यासाठी चार आर्यसत्य सांगितले. दुःखाचे मुळ कारण तृष्णा च्छा होय. एखादी गोष्ट मिळाली नाही तर, माणूस दुःखी होतो. म्हणुन इच्छेचा त्याग करावा असे बुध्दाचे मत आहे. आपले जिवन सुखकर जगण्यासाठी आर्यअष्टांग मार्गाचा अवलंब करावा आणि त्याचे काटेकोरपणे पालन करावे मोक्ष प्राप्त होवु शकतो. खोटे बोलु नये, चोरी करू नये, हिंसा करू नये, मादक पदार्थाचे सेवन करू नये आणि चे पालन करावे म्हणजे परस्त्री पवित्र मानावी अश्या प्रकारचे तत्व सांगुन मानवाचे जिवन सुखकर केले. अनाचार आणि माजनार नाही तसेच गुन्हेगार प्रवृत्तीत वाढ होणार नाही. प्रज्ञा, शिल आणि करूणा हया त्रिशरणाव्दारे आदर्श ो कल्पना बुध्दानी केली. अहिंसा आणि समानतेची शिकवण मानवाला दिली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हि ोची तत्वे बुध्दानी आपल्या तत्वज्ञानातून दिली. समानतेच्या आधारावर सर्वांना बौध्द धर्मात प्रवेश दिल्यामुळे दिन ा समान अधिकार मिळाला. आणि परिवर्तनवादी समाज बुध्दतत्वज्ञानातून घडला. गौतम बुध्द हे एक राजकुमार असुन ाधे वन व्यथीत केले. आणि दुःख मुक्त होण्याचा संदेश जगाला दिला. विषमता नष्ट करण्याचे कार्य बुध्दाने केले ाजात समतेचे धडे दिले त्यामुळे ''युध्द नको बुध्द हवा'' असे म्हणु लागले. अश्याप्रकारे बुध्दानी आपल्या तत्वज्ञानातून करण्याचा प्रयत्न केला व एका सुखी समाज निर्माण केला.

बुध्दाने बौध्द धर्म स्थापन करून सर्वांना समानतेने आपल्या धर्मात प्रवेश दिला आणि आपल्या शिकवणूकीतून किंवा दारे जगाचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हया धर्माचा देशात व विदेशात फार झपाटयानी प्रसार प्रचार जही बौध्द धर्म टिकून आहे. मौर्य सम्राट अशोकानी कलींग युध्दानंतर बौध्द धर्म स्विकारला आणि त्यानंतर त्या ात–विदेशात प्रसार प्रचार केला. तर हर्षवर्धनानी बौध्द धर्म स्विकारून जगप्रसिध्द नालंदा विद्यापिठाचा विकास केला. रीत विचार करता असे दिसून येते की, पूर्वीच्या धर्मांनी केलेले संस्कार अजूनही समाज पूर्णपणे विसरलेला नाही. ींमधील भेदभाव जातीतच पोटजात हे घेवुन लोक फिरतांनी दिसतात. बुध्दाच्या तत्वज्ञानातील समानता विसरून जातीतच वाद घालतांना आजचा माणूस दिसत आहे. पुन्हा श्रेष्ठ कनिष्ठ हा भेदभाव दिसून येत आहे. बुध्दानी चार आर्यसत्य, अष्टांग मार्ग, पंचशिल, त्रिशरने हे आजचा मानव पाळत नाही तर दुःख मुक्त कस होणार. जगात ा, ... भ्रष्टाचारी, हिंसक, मादक पदार्थाचे सेवन, स्त्रियांची छेळखानी, बलात्कार, खुन, दरोडे अश्या प्रकारचे कृत्य . त्यामुळे जगात दुःख आहे. आजचा माणूस हा वासनांच्या मोहाच्या आणि विकाराच्या आहरी गेला आहे. बुध्दाची त्ये पेठयांमध्ये बंद केली आणि पंचशिलाचे पायपोस केलेले दिसुन येते म्हणुन समाजातील दुःख गेले नाही. ा, निष्ठा, स्वंयप्रेरणा समाजातून नाहीसी झाली आहे. प्रेरणा, प्रेरकता आणि प्रयत्न हया मानवी उत्त्थानाच्या रजा समाजातून नाहीस्या होत आहेत. कष्टाची जागा सुखविलासानी घेतली आहे. समाजाच्या गरजा कश्या आणि त्र समजने कठीण झाले आहे. आज बुध्दाचे तत्वज्ञान बाजूला सारून बुध्दाची मुर्ती शोभेची वस्तू बनली आहे. ार्थासाठी कोण – कोण कुठे स्वतःला गहाण ठेवेल याचे तारतम्य नाही. जोपर्यंत माणसाच्या मनात समाजाबद्दल था नैतीकता हया गोष्टी प्रत्यक्ष माणसात निर्माण होणार नाही तोपर्यंत माणूस दुःख मुक्त होणार नाही. बुध्दाच्या च जगाचे उद्धार होईल.

Off. Principal
Late ... P.W. College
... Bhandara

N. P. W. College, Lakhani Ref. No. Dt. Distt. Bhandara

**संदर्भसुची**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग – 1 (1920 ते 1926) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई प्रथम आवृत्ती – 2002
2. दिक्षीत नी.सी. – "भारताचा इतिहास (प्रारंभापासून ते इ.स. 1761 पर्यंत)" पिंपळापुरे प्रकाशन
3. कोलारकर शरद – प्राचिन भारताचा इतिहास (प्रारंभापासून ते इ.स. 1206 पर्यंत)" श्री मंगेश प्रकाशन
4. कौसल्ययन भदंत आनंद – "यदि बाबा न होते" बुध्दभूमी प्रकाशन नागपूर आवृत्ती 5 (1994)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani
Ref No.
Dt.
Distt. Bhandara